महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,
नगर रचना संचालनालय, तळमजला,
मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२९४९४
Email ID : dirtpvd.pune@maharashtra.gov.in/
ddtp.urc@maharashtra.gov.in

## कार्यालयीन आदेश

विषय : मंजूर UDCPR मधील काही तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणीबाबत सुधारणा करणेसंदर्भात विनियम क्र.१.१० अन्वये मंजूर नियमावलीस शुध्दीपत्रक / पुरकपत्रानुसार कार्यवाही होणेबाबत.

संदर्भ : शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र.टिपीएस १८२०/६१४/प्र.क्र.७९/२०२१/नवि-१३, दि. ०२/१२/२०२१.

शासनाने दि. ०२/१२/२०२० रोजी मंजूर केलेल्या UDCPR मधील काही तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणीबाबत सुधारणा करणेसंदर्भात विनियम क्र.१.१० अन्वये मंजूर नियमावलीस संदर्भिय शासन निर्णयान्वये शुध्दीपत्रक / पुरकपत्र निर्गमित केले आहे. या शुध्दीपत्रकातील अ.क्र. ५६ येथे Appendix-C, C-७.१ Technical Person to License मध्ये सुधारणा केली आहे.

या सुधारणेनुसार UDCPR मधील Appendix-C अंतर्गत C-३ Engineer, C-४ Structural Engineer, C-५ Supervisor, C-६ Town Planner यांना संबंधित प्राधिकरणाकडील अथवा नगर रचना संचालनालयाकडील परवाना आवश्यक आहे. उपरोक्त् सुधारणेनुसार संचालनालयाकडे नोंदणी केलेल्या परवानाधारकास संपूर्ण राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणाच्या तसेच प्रादेशिक योजना क्षेत्रात काम करण्यास परवानगी असेल.

सबब, UDCPR मधील Appendix-C अंतर्गत C-३ Engineer, C-४ Structural Engineer, C-५ Supervisor, C-६ Town Planner यांना नगर रचना संचालनालयाच्या स्तरावरील परवाना निर्गमित करणे व त्यांची नोंदणी करणे यासाठीची आवश्यक सर्व कार्यवाही करण्यासाठी सहसंचालक, नगर रचना, अंमलबजावणी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुसार सदरची कार्यवाही त्यांनी मा.संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने करावी.

**(मसुदा मा.संचालक यांनी मान्य केला असे.)**

जा.क्र. UDCPR/Appendix-C/परवाना/५७२८
दिनांक :०८/१२/२०२१.

( रा.मे. पवार )
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे करिता

प्रत
१) मा. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
२) संचालक, नगर रचना तथा सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (सस्नेह)
३) संचालक, नगर रचना तथा मुख्य नियोजनकार, मऔविमं, मुंबई (सस्नेह)

४) सहसंचालक, नगर रचना तथा सहसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) सहसंचालक, नगर रचना, अं.क., पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) सहसंचालक, नगर रचना, पुणे / कोकण / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अमरावती. त्यांनी सदरचे आदेश सर्व शाखा कार्यालयाना अवगत करावेत.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी-

१) उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे / नागरी संशोधन घटक, पुणे / बृहन्मुंबई.
२) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १ / २ / ३ / ४ / ५ / ६ / ७.
३) श्री. पालकर, स्वि.स. / श्रीमती हुपरे / श्री. चंद्रस (उच्चश्रेणी लघुलेखक)
४) परिपत्रक नस्ती.